# मुंबईच्या रस्त्यांनी घेतला श्वास; मेट्रोचे ६३% बॅरिकेड्स काढले

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

शहरात सुरु असलेल्या मेट्रोच्या कामाकरिता १हजार १६५ मीटरमध्ये लावलेले ६३ टक्के बॅरिकेड काढण्यात आले आहेत. त्यामुळे शहरातील सुमारे ४५ टक्के रस्ते पूर्ववत झाले झाल्याने रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला असून वाहतूक कोंडीचा प्रश्न काहीसा कमी झाला आहे.



मेट्रो प्रकल्पाच्या पॅकेज २ मधील १हजार १६५ मीटरमध्ये बॅरिकेट केलेले ४५५ टक्के रस्ते मोकळे केले आहेत. यामध्ये सीएसएमटी, काळबादेवी, गिरगाव आणि ग्रँट रोडचा समावेश आहे त्याचप्रमाणे पॅकेज १ मध्ये, कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या रस्त्याच्या ३ हजार २३६ मीटर रस्त्यांपैकी ८१ टक्के भाग पुर्ववत केला आहे. ३३.५ किमी लांबीच्या भूमिगत मेट्रो मार्गावरील सर्व सात पॅकेजमधील जवळपास ६३ टक्के रस्ते यापूर्वीच मोकळे केले आहेत. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गावरील एकूण २८हजार ८८५ मीटर रस्त्यांपैकी १८ हजार १२३ मीटर रस्त्यावरील बॅरिकेड हटविले आहेत. बॅरिकेड्स हटवल्यानंतर मेट्रो ३ स्थानकांवरील मोकळ्या जागेत झाडे लावण्यात येणार आहेत.

मेट्रो ३ मार्गावर, विशेषत: स्थानकांच्यावर २ हजार ६०० झाडे लावली जातील. आत्तापर्यंत सीप्झ,एमआरडीसी,सितलादेवी, दादर, सिद्धिविनायक, विज्ञान संग्रहालय, महालक्ष्मी, मुंबई सेंट्रल, सीएसएमटी, चर्चगेट, विधान भवन आणि कफ परेड अशा १३ स्थानकांवर ५०० झाडे लावण्यात आली आहेत.